# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** वागले इस्टेट

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1056 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**23/10/2024 15:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | ४२० |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ४०९ |
| 3 | भारतीय दंड संहिता १८६० | ४०६ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 01/05/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 30/06/2024
**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/10/2024 **Time (वेळ):** 12:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 047

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/10/2024 15:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मेसर्स हरे कष्ण इंटरप्राईजेसचे,कार्यालय ए/313तिसरा मजला ओमेगा, बिझनेस पार्क, कामगार हस्पिटल,समोर रोड नं33, वागळे इस्टेट ठ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. उत्तम सिताराम ढोरे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** सिताराम ढोरे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 783, रो हाउस ,म्हाडा, मोरवाडी, पिंपरी,पुणे-18,पिंपरी,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | 783, रो हाउस ,म्हाडा, मोरवाडी, पिंपरी,पुणे-18,पिंपरी,पुणे शहर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922929128

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रवीण तुळशीराम संकपाळ | | वडील का नाम : तुळशीराम संकपाळ | 1. आर एच नं12जिमी टवर,, सेक्टर 4, एमजीएम हस्पिटल , जवळ वाशी नवीमुंबई ,बृहनमुंबई शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

सदरचा गुन्हा हा अर्जावरुन दाखल

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनी नोटा | 12,000,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

जबाब दि.23/10/2024

मी, श्री. उत्तम सिताराम ढोरे, वय - 54 वर्षे, धंदा-व्यवसाय, राह. रो हाउस नं. 783, म्हाडा, मोरवाडी, पिंपरी, पुणे-18. मो.नं. 9922929128.

मी वर नमूद ठिकाणी माझे परीवारासह राहत असून माझा ‘मेसर्स सनस्टार प्लास्टोटेक प्रायव्हेट लिमिटेड’ हया कंपनीचा कारखाना असून तो सध्या गट नं. 478/1/3, पिंपळे जगताप, शिरूर, पुणे येथे चालु आहे. सदर कारखान्याचे मी व माझी पत्नी सौ. राजेष्वरी उत्तम ढोरे, वय-47 वर्षे असे आम्ही दोघे संचालक असून आमचे कंपनीचे युनियन बॅक ऑफ इंडीया या बॅकेचे फग्युशन कॉलेज रोड, पुणे येथे खाते क्र. 489405010951082 असे आहे. तसेच आमचे कंपनीच्या माजी संचालक कैलासवासी शांता कराळे यांचे कॉसमॉस बॅकेचे, अजमेरा शाखा, पिंपरी, पुणे येथील खाते क्र. 0330501078241 असे आहे .

माझे उपरोक्त नमूद कारखान्यात प्लास्टीक इंजेक्षन मोलडींग पार्ट्स तयार करतात. सदर कारखाना हा गट क्र. 478/1/3, विलेज - पिंपळे जगताप, ता. शिरूर, जि. पुणे पिन कोड क्र.412208 या भुखंडावर भाडेकरारावर 10 वर्षे करिता असून आता साधारणतः उर्वरित दीड वर्शाचा कालावधी बाकी आहे. त्यामुळे माझे उपरोक्त ठिकाणचे भाडेकरार संपल्यानंतर दुसऱ्या ठिकाणी मला कारखाना हलवणे जरूरी असल्याने मी कारखान्यासाठी नवी जागा तळेगाव/चाकण येथील महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाच्या औदयोगिक परिसरामध्ये साधारणतः दोन ते तीन एकर अशा भुखंडाच्या शोधात होतो परंतु महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाच्या कार्यप्रणाली बाबत योग्य माहिती नसल्यामुळे व योग्य रितीने पाठपुरावा करू न शकल्यामुळे वारंवार अपयश येत होते.

त्यामुळे माझे कौटुंबिक मित्र श्री.अनिल भांदुर्गे, राह. क्यू.ए/3/3, प्लॅट नं. 301, अजमेरा कॉम्प्लेक्स, पिंपरी, पुणे याचेकडून महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाचे स्थानीक सल्लागार श्री. रामदास उन्नीकृष्णन नायर, राह. महिंद्रा अँथेया, बिल्डींग नं. डी/4, ए प्लॅट नं. 003, नेहरूनगर, पिंपरी यांची मला मदत हाईल असे सांगून माझे कौटुंबिक मित्र श्री. अनिल भांदुर्गे यांनी माझी ओळख महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाचे स्थानिक सल्लागार श्री. रामदास उन्नीकृष्णन नायर यांचेशी करून दिली. श्री. अनिल भांदुर्गे यांनी श्री. रामदास उन्नीकृष्णन नायर यांचे मार्फत ‘मेसर्स हरे कृष्ण इंटरप्राईजेस’ चे मालक श्री. प्रविण तुळशीराम संकपाळ, पत्ता: ए/313, तिसरा मजला, ओमेगा बिझनेस पार्क, कामगार हॉस्पीटल समोर, रोड नं. 33 ए, वागळे इस्टेट, ठाणे यांचेशी त्यांचे कार्यालयात मे 2023 मध्ये भेट करून दिली. तेव्हा श्री. प्रविण संकपाळ यांनी सदर कामासाठी प्राधान्य तत्वावर महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाचा तळेगाव टप्पा क्रमांक दोन मधील साधारणतः दोन ते तीन एकरचा भुखंड भाडेकराराने मिळवून देण्याचे आमीष मला दिले.

श्री. प्रविण संकपाळ यांनी तळेगाव महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाच्या टप्पा क्रमांक दोन मध्ये डी. 24 व डी. 25 हे अनुक्रमे 5332 चै.मी.व 4887 चै.मी. क्षेत्रफळाचे दोन भुखंड उपलब्ध असून 95 वर्शाच्या भाडेकरारावर महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाच्या काही अटी व शर्ती पाळून मला मिळवून देवू शकतात अशी हमी दिली होती. परंतु त्यासाठी काही औपचारिकता व प्रक्रिया पार पाडावी लागेल असा त्याने मला आश्वासन दिल्याने मी त्याचे बोलण्यावर विश्वास ठेवून आमचेत सदर बाबत सामंजस्य करार करण्यात आला. माझे विश्वास संपादन करणे करिता श्री. प्रविण संकपाळ याने 30 ते 45 दिवसांत प्लॉट मिळवून देणार असे लेखी सदर सामंजस्य करारामध्ये नमूद केले. सदर सामंजस्य करारानुसार मला, श्री. प्रविण संकपाळ यांनी सदर सामंजस्य करारातील

कलम क्रमांक 2 मधील मुद्दे क्र. 1 ते 9 प्रमाणे सदर प्रक्रिया पार पाडण्यासाठी मी, 725/- रू. प्रति चौरस फूट प्रमाणे साधारणत: 8 करोड रूपये टप्प्या - टप्प्याने महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळ यांना देण्याचे ठरले. त्यामध्ये प्रविण संकपाळ यांना देण्यात येणारी रक्कम साधारणत: 2 कोटी रूपये देखील सामील होती. सदर टप्पे विहीत नियमानुसार पार पाडण्यासाठी आमच्यातील अटी व शर्ती नुसार श्री. प्रविण संकपाळ हे मला ऑनलाईन अर्ज करणे पासून महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळाच्या कार्यालयात भुखंड वाटपासाठी लागणा-या सर्व कागदपत्रांची व संबधित अधिका-यांशी संपर्क साधण्यापासून ते भुखंडाचा हक्क मिळेपर्यत अशी सर्व काम करतील असे ठरले. त्यांनतर आमचेत सांमजस्य करार झाल्यानंतर मी खालील तखत्यात नमूद प्रमाणे त्याला रक्कम अदा केली.

अ.क्र. दिनांक अर्जदार बॅक व खाते क्रमांक गैरअर्जदार बॅक व खाते क्रमांक रूपये

1)25/05/2023 युनियन बँक89405010951082, आय.सी.आय.सी.आय बॅक, खाते क्र. 000401579126, 50,00,000

2)01/06/2023युनियन बँक, 489405010951082,आय.सी.आय.सी.आय बँक, खाते क्र. 000401579126, 50,00,000

3)05/06/2023युनियन बँक 489405010951082,आय.सी.आय.सी. आय बँक, खाते क्र. 000401579126, 15,00,000

4)06/06/2023 रोख रक्कम दिली ------------- ---------------------------- 20,00,000

5)15/06/2023 रोख रक्कम दिली ----- --------------------------------------------------, 15,00,000

6)28/06/2023 कॉसमॉस बँक0330501078241, आय.सी.आय.सी.आय बँक, खाते क्र000401579126, 5,00,000

एकूण रूपये-1,55,00,000

श्री. प्रविण संकपाळ यांनी भुखंड वितरणपत्र मिळविणे आवश्यक असतांना वितरणपत्राचे काम होण्यासाठी 15 लाख रूपये लागतील असे सांगितल्याने मी दिनांक 05/06/2023 रोजी आर.टी.जी.एस द्वारे 15 लाख रूपये, दिनांक 06/06/2023 रोजी पुन्हा मला वेगवेगळे कारण सांगून 20 लाख रूपये रोख स्वरूपात घेतले. त्यांनतर दिनांक 15/06/2023 रोजी पुन्हा प्रविण संकपाळ यांनी वितरणपत्र मिळविण्यासाठी 15 लाख रूपये रोख स्वरूपात दिले. सदरची रोख रक्कम 35 लाख रूपये मी, श्री. प्रविण संकपाळ यास दिले त्यावेळी माझेसह श्री. निवृत्ती कराळे उपस्थित होते. दिनांक 28/06/2023 रोजी 5 लाख रूपये आमचे कंपनीच्या माजी संचालक मयत शांता कराळे यांचे दि. कॉसमॉस बॅकेचे, अजमेरा शाखा, पिंपरी, पुणे येथील खाते क्र. 0330501078241 यावरून आर.टी.जी.एस द्वारे अदा केली. सदर रक्कम खूप मोठी असल्याने इतक्या मोठया प्रमाणात माझेकडे रक्कम नसल्याने सदरची रक्कम देणेसाठी आम्हास आमची कंपनीची मौजे नाणेकरवाडी, चाकण ता.खेड, जि.पुणे येथील जुना भुखंड विकणे क्रमप्राप्त झाले.

त्यांनतर मी, श्री. प्रविण संकपाळ यांना वारंवार भुखंड वितरणपत्र झाले अगर कसे याबाबत पाठपुरावा करीत होतो परंतु तो मला वारंवार वेगवेगळी कारणे देवून चालढकल करत होता. त्यावरुन मला त्यांचा संशय येवू लागल्याने मी त्यासंदर्भात श्री. अनिल भांदुर्गे व श्री. रामदास उन्नीकृष्णन नायर यांचे जवळ शंका उपस्थित केली परंतु कोणाकडून ही मला योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने प्रविण संकपाळ यांचेकडून माझी आर्थिक फसवणूक झाल्याची मला पुर्ण खात्री झाली. खुप प्रयत्नानंतर व पाठपुरावा केल्यानंतर दिनांक 23 ऑगस्ट 2023 रोजी मी, श्री.निवृत्ती कराळे, श्री. प्रविण संकपाळ व श्री. रामदास नायर अशी आमचेत बैठक झाली. सदर बैठकीत श्री. प्रविण संकपाळ यांनी काही बाबींमुळे अडचणी निर्माण झाल्याने सदरचे वितरणपत्राचे काम अडल्याचे सांगून 2 ते 3 आठवडयात म्हणजेच 10 सप्टेंबर 2023 पर्यत संपुर्ण काम करून देतो अन्यथा घेतलेली संपुर्ण रक्कम रू. 1,55,00,000/- परत करण्याचे आष्वासन दिले परंतु त्यानंतर देखिल प्रविण संकपाळ यांनी माझे काम केले नाही तसेच मी त्यांना फोन ई-मेल, व्हॉटस अँप मेसेजेस केले असता त्याला देखील उत्तर देण्याचे टाळू लागले.

त्यानंतर मी पुन्हा पाठपुरावा करून श्री. निवृत्ती कराळे, श्री. प्रविण संकपाळ, श्री. अनिल भांदुर्गे व श्री. रामदास नायर यांच्या सोबत दि. 17/09/2023 रोजी प्रविण संकपाळ यांचे ठाणे येथील कार्यालयात 'मे. हरे कृशणा इंडस्ट्रियल इन्फ्रास्ट्रक्चर', ए/313, तिसरा मजला, ओमेगा बिझनेस पार्क, कामगार हॉस्पीटल समोर, रोड नं. 33 ए, वागळे इस्टेट, ठाणे येथे बैठक बोलावली. परंतु सदर बैठकीस अनिल भांदुर्गे व रामदास नायर उपस्थित राहीले नाहीत. सदर बैठकीत मी, श्री. प्रविण संकपाळ यांना सामंजस्य करारामधील टप्प्या पेक्षा जास्त रक्कम रूपये

1,55,00,000/- अदा केल्याचे निदर्शनास आणून दिले जे त्यांनी मान्य केले. त्यांनी मला त्यावेळी सांगितले की ते दि. 30 सप्टेंबर 2023 पर्यत 35 लाख रूपये परत करतील व बाकिचे रूपये 1,20,00,000/- दिनांक 30 सप्टेंबर 2023 नंतर देणेची हमी दिली.

परंतु दिनांक 30 सप्टेंबर 2023 पर्यत श्री. प्रविण संकपाळ यांनी कुठलीही रक्कम मला परत केली नाही म्हणून मी, श्री. प्रविण संकपाळ यांना त्याबाबत आठवण केली असता त्यांनी आम्हास यापूर्वी दिलेला धनादेश हा 15,00,000/- रूपये रकमेचा भरणेस सांगितले. मी सदर धनादेश बँकेत वटणेसाठी टाकला असता तो देखिल न वटता परत आला खात्री करणे करिता मी एम.आय.डी.सी, मुंबई कार्यालयात श्री. प्रविण संकपाळ याचे बाबत चौकशी केली असता श्री. प्रविण संकपाळ अशा नावाचा कोणताही इसम एम.आय.डी.सी चे भुखंड मिळवून देण्याचे काम करत नाही असे समजले यावरून आमची आर्थिक फसवणूक झाल्याची मला पुर्ण खात्री झाली. त्यानंतर मी स्वतः एम.आय.डी.सी कडे पाठपुरावा करून एम.आय.डी.सी च्या भुखंडाचे माझ्या कंपनीच्या नावे अलॉटमेंट करून घेतले.

मी परत त्याचेकडे वारंवार पाठपुरावा केला असता त्याने मला 30 लाख रूपये बँक ट्रान्सफर व 5 लाख रोख रक्कम परत केली. सदर वेळी त्याने आम्हास एकूण 1 कोटी 20 लाख रूपयांचे एकूण 8 धनादेश देवून दि. 06/12/2023 रोजी एम.ओ.यु सध्दा बनावला. त्यात तो आम्हास एकूण 1 कोटी 20 लाख देय असल्याने त्याने 8 धनादेश दिल्याचे नमूद होते. सदरचे धनादेश मी बँकेमध्ये वटणे करिता सादर केला असता ते सर्व धनादेश वटले नाही.

तरी ‘मे. हरे कृष्णा इंटरप्रायजेस’ व ‘हरे क्रिष्णा इंडस्ट्रीयल इन्फ्रा एल.एल.पी.’ चे मालक आरोपीत श्री. प्रवीण तुळशीराम संकपाळ याने मला महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडाळ तळेगाव, टप्पा क्रमांक दोन मधील साधारणतः दोन ते तीन एकरचा भुखंड 95 वर्षाच्या भाडेकराराने मिळवून देण्याचे आमीष देवून वेगवेगळी कारणे सांगून माझेकडून वेळो - वेळी रू. 1,55,00,000/- एवढी अशी रक्कम घेवून व मी त्यास दिलेली रक्कम मला परत करावी याकरिता पाठपुरावा केल्यानंतर मला त्याने 35 लाख रूपये परत करून माझी एकूण 1 कोटी 20 लाख रूपयांची फसवणूक केली म्हणून त्याचे विरूध्द कायदेशीर कारवाई होणे करिता माझी फिर्याद आहे.

माझा जबाब मी वाचून पाहीला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

Sanjay Anant Sawant

**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

**(4) Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली**.)**

**R.O.A.C.(**आर**.** ओ **.**ए **.**सी**.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** Shivaji Parbatrao Ga

**Rank(**पद**):** I (Inspector)

**No.(**सं**.):** PI

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)